**Shailesh Tilak**
General Secretary
568, Narayan Peth, Tilak Wada,
Pune-411 030
+91-9422029656
gs.mahajudo@gmail.com

**MAHARASHTRA JUDO ASSOCIATION**
**महाराष्ट्र ज्युदो संघटना**
Affiliated to Judo Fedration of India & Maharashtra Olympic Association
Trust Registration Number: F-3967 Mumbai

पुणे, 18.12.2022

**सर्व जिल्हा सचिव आणि सर्व प्रशिक्षक आणि खेळाडू**

**विषय: खेलो इंडिया युथ ज्यूदो <u>राज्य निवड</u> स्पर्धा**

महोदय,

आपणा सर्वांना माहितीच आहे की केंद्र शासनातर्फे खेलो इंडिया युथ गेम्ससाठी आयोजित निवड स्पर्धेचे दिल्ली येथे ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियातर्फे आयोजन होत असून या स्पर्स्धेतून प्रत्येक वजनगटातील आठ स्पर्धकांची निवड केली जाणार आहे. पुढे हे निवडले गेलेले स्पर्धक भोपाळ येथील युथ (19 वर्षाखालील) राष्ट्रीय स्पर्धेत खेळतील.

फेडरेशनच्या पहिल्या परिपत्रकात दिल्ली स्पर्धेसाठी खेळाडूंचा अमर्यादित प्रवेश होता. या खेळाडुंचे जन्मवर्ष 2005-2008 होते पण नंतर त्यात बदल करण्यात येवून तो प्रती राज्य प्रती वजनगट वर्ष 2004 ते 2007 दरम्यान जन्मलेले दोन खेळाडू असा निश्चित करण्यात आला आहे. म्हणून आपल्याला निवड स्पर्धा घेणे आवश्यक आहे.

या निवडस्पर्धेसाठी आपण 2004 ते 2007 वर्षांमधील जन्मलेले असे खेळाडू निवडत आहोत ज्यांनी कोल्हापूर येथील 49 वी ज्युनियर्स स्पर्धा आणि धुळे येथील 49 वी कॅडेट स्पर्धेमध्ये पदक मिळवलेले आहे. याशिवाय या स्पर्धा दरम्यान ज्यूदो स्पर्धांसाठी भारताचे प्रातिंनिधीत्व करण्यासाठी गेल्याने राज्य स्पर्धा न खेळलेले खेळाडूंनाही संधि देणार आहोत. हे सर्व खेळाडू खालील दोन यादीमध्ये दिले गेले आहेत.

**पहिली यादी:-** यातील काही वजनगटात दोनच खेळाडू असल्याने त्यांची राष्ट्रीय निवड स्पर्धेसाठी सरळ निवड झाली आहे. **<u>या खेळाडूंनी फेडरेशनने दिलेला गुगल नोंदणी फॉर्म लगेचच भरून अपलोड करावा</u>**.
**दुसरी यादी:-** दुसऱ्या यादीत राज्य निवड स्पर्धेसाठी पात्र खेळाडू आहेत. आणि त्यांची पुणे येथे निवड स्पर्धा होईल. सर्वांना विनंती की या दुसऱ्या यादीतील खेळाडूंना
**<u>ज्यूदो हॉल, बालेवाडी क्रीडा संकुल, पुणे येथे ; दिनांक 23 डिसेंबर 2022 रोजी दुपारी 01.00 वाजता</u>**
उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. श्री तुषार सांगळे (9860602015) हे या निवड स्पर्धेचे प्रमुख असून स्पर्धा वेळापत्रकबाबत ते स्पर्धकांना बालेवाडी येथे सूचना देतील.

विनित,

महासचिव

Maharashtra Judo Association
T.R.No. F- 3967 Mumbai